प्रकाशन दिनांक १६-८-२०१७

# अतिथी संपादकीय

‘भारतीय स्वातंत्र्याची सत्तरी’ या निमित्ताने परिवर्तनाच्या वाटसरूने विशेष विभाग प्रसिद्ध करणे हे त्यांच्या नावाला व त्यांनी स्वीकारलेल्या विचारधारेला धरूनच आहे. वाटसरूने आतापर्यंत अनेक विशेषांक काढले आहेत, त्यात हा आणखी एक मानाचा तुरा. आम्ही या विषयावर सतत संशोधन, लेखन, अध्ययन आणि अध्यापन करत आहोत, म्हणून या अंकाची अतिथी संपादक म्हणून जबाबदारी आम्हावर टाकण्यात आली. आम्ही आमच्या परीने संपर्कातील अभ्यासकांना व कार्यकर्त्यांना लेखनाची गळ घातली व त्याचा पाठपुरावा केला. यामुळे अनुभव कथनावर आधारित लेख, कविता, प्रकल्पावर आधारित लेखन, सक्रिय व्यक्तींनी दिलेल्या योगदानाबाबतचे लेख, शिक्षक-प्राध्यापक यांचे लेखन, कार्यकर्त्यांचे लेखन, संशोधनपर लेख इ. ऐवज आमच्यापर्यंत येऊन पोहचला. त्यातील काही निवडक लेखनाचे संपादन करून हा ३१ ऑगस्ट २०१७चा अंक आपल्या हाती देत आहोत. अनुक्रमणिकेमध्ये लेखांची शीर्षके आणि त्याद्वारे विषय आल्याने येथे पुन्हा त्याची पुनरुक्ती करीत नाही. फक्त त्यामागील भूमिकेचे चिंतन आपल्यासमोर ठेवावेसे वाटते म्हणून हे काही शब्द.

‘जागतिकीकरण’ या संकल्पनेत ‘जगाशी संपर्क’ असा अर्थ अभिप्रेत आहे. जगाशी संपर्क कोण ठेवते? जगाशी संपर्क का ठेवायचा? संपर्कामध्ये जातवर्गपितृसत्ताक भांडवली व्यवस्थेचे काय हितसंबंध असतात? तो ठेवणे आवश्यक आहे का? काही लोक जगाशी संपर्कात असतात तर काही लोक नसतात असे म्हणता येईल का? जगाशी संपर्क याचा सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक अर्थ काय? संपर्क संबंधाने कोणाचे वरकड कोणाकडून लुटले जाते? या संदर्भांना वगळून जागतिकीकरण ही संकल्पना पाहता येईल का? जागतिकीकरणात माणसांचे माणसांची संपर्क वाढतात असे ढोबळपणे म्हटले जाते. यात त्यांच्या आनंदासाठी माणसे मदत करतात, एखाद्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी जातात, ते संघटित होतात, त्यांच्या संघटना बनतात. ही प्रक्रिया तर इतिहास काळापासून सुरूच आहे की! मग जागतिकीकरणात यापेक्षा नवे काय घडते? जागतिकीकरणात भांडवलशहा एकत्रित येतात, त्यांच्या उत्पादनाला बाजार शोधतात, गिऱ्हाईके तयार केली जातात, कमी

श्रमात काम करणारे घटक शोधले जातात, भांडवली तंत्रज्ञान कौशल्य विकसित करून परिघावरील घटकाला आणखी बाहेर ढकलले जाते, लोकांची संघटितपणे एकत्र येण्याची-लढण्याची ताकद कमी केली जाते, एखाद्या सामाजिक प्रश्नाचे खापर परीघाबाहेरील घटकांवर फोडले जाते, तंत्रज्ञान कौशल्याचा वापर संघटित आवाज फोडण्यासाठी केला जातो. भटक्या-विमुक्तांच्या प्रश्नांबाबत भारतीय स्वातंत्र्याच्या सत्तरी निमित्त असेच घडले आहे असे खेदाने म्हणावे लागते.

जगातील, भारतातील आणि महाराष्ट्रातील भटका समाज याहून वेगळे काय करत होता आणि आहे? हा समूह इतिहास काळापासून योग्य अशा स्थानासाठी सतत स्थलांतरित होत आहे, भटकत आहे. नवे-नवे प्रांत, प्रदेश, देश पादाक्रांत करत आहे. या स्थलांतरातून-भटकंतीतून ते अनेक प्रकारचा ज्ञानव्यवहार करत असतात. नवनव्या भाषा शिकतात, पिक-पाणी पाहतात, इकडची माहिती तिकडे पुरवतात, माणसं जोखतात-पारखतात, साहित्य निर्मितीच्या प्रेरणा बनतात, मौखिक पद्धतीने साहित्य जतन करतात, दुःखाच्या कहाण्या बनवतात, जगण्यातली विविधता अनुभवतात, यासोबत आपली भली-बुरी संस्कृती जपतात.

गावात घर नाही, शिवारात शेत नाही, गावाची हागणदारी तीच यांची वतनदारी, औपचारिक शिक्षण नाही, वसलेल्या जागेचा ७/१२ नाही, झोपडीला कावड नाही की भिंतीवर तनास नाही, झोपडीत दिवा नाही, बिदागी शिल्लक नाही की बँकेत खाते नाही, समाजात जगताना कोणताच सन्मान नाही. साधारणतः वसाहतिक काळापासून भटक्यांची अशी स्थिती असली तरी त्यापूर्वी किंवा नंतर काही सकारात्मक बदल झाला असावा याचा इतिहास नाही. ही वारंवार कथन केलेली स्थिती जागतिकीकरणात आम्ही पुन्हा एकदा पुढे आणतो आहोत.

या भटक्यांना जागतिकीकरणात काय भविष्य आहे? पूर्वी जे जगण्याचे प्रश्न होते तसेच आजही त्यांचे प्रश्न आ वासून उभे आहेत. अन्नाची सुरक्षा नाही, पिण्यायोग्य पाणी नाही, अंगभर वस्त्र नाही, पुरेशी शेती नाही, स्थिर होण्यासाठी साधन नाही, म्हणजे रोजगार नाही, रोजगाराचे भांडवली कसब नाही, भटक्यांच्या कौशल्याला बाजारात किंमत नाही, बाजारू-भांडवली कौशल्ये भटक्यांकडे नाहीत, शिक्षण नाही, शिक्षणाची परंपरा नाही, बाजारू-भांडवली शिक्षण महागडे आहे, जागेचे भाव गगनाला भिडले आहेत, शहरातल्या कोपऱ्यातली यांच्या पालाची जागा आता मध्य वस्तीने वेढली आहे आणि जमीन व्यवहारातील भू-माफियांनी भटक्यांची वस्ती वसण्याआधीच उठवली आहे.

जसजसा या भटक्यांचा संपर्क इतर देश-प्रांताशी येत गेला तसे त्यांच्या जीवनातील सकारात्मक बाबी आकुंचत गेल्या. भटकंतीतून कमावलेले ज्ञान आधुनिकतेत कुचकामी ठरले, भटकता-भटकता शिकलेल्या भाषा व भाषा शिकताना विकसित केलेलं तंत्र कुचकामी ठरलं, युगायुगापासून दगड फोडण्याचे कौशल्य जेसिबीच्या काळात नष्ट झाले, दगड खाणी गेल्या, तेथील इनामी वतनी जमिनी गेल्या. कष्टाचे गाणे गात नवनवे आविष्कार प्रसवणारे भटके चंदेरी दुनियेचे लाभधारक बनत नाहीत, कलाविष्काराचे त्यांना पेटंट मिळत नाही, वनस्पतीच्या औषधी घटकांचा शोध घेणारे भटके डॉक्टर बनत नाही, पशु पालक भटके त्यांच्या दुधाचा दही-ताक-लोणी-तूप-पेढा-बर्फीपर्यंत संशोधन करणारे चितळेंसारखे मालक बनत नाहीत, उडत्या पक्ष्याचा आवाज ओळखून त्याचे नाव सांगणारी भटकी मुलं साक्षर मानली जात नाहीत, ‘खतरों के खिलाडी’ राहिलेले डोंबारी या टी.व्ही. चॅनेलला कधी दिसले नाहीत. भटक्यांचे असे अनंत प्रश्न (माणूसपणाचे आणि ज्ञान अधिमान्यतेचे) स्वातंत्र्याच्या सत्तर वर्षानंतरही कायम आहेत. भटक्यांच्या समस्येवर अनेक खाजगी, निमसरकारी आणि सरकारी समित्या, आयोग, अहवाल आले पण

त्यांच्या शिफारसी स्वीकारून अंमलबजावणी झाली नाही. यामुळे कल्याणकारी राज्यातही भटक्यांचा संघर्ष जारी आहे.

सुरुवातीच्या काळातील भटक्यांच्या चळवळीतील प्रमुख मागण्या अन्न, वस्त्र, निवारा अशाच राहिल्या. जागतिक आरोग्य संघटनेच्या मापदंडानुसार अन्न, वस्त्र, निवारा, पाणी, रस्ते, आरोग्य, वीज आणि सन्मान यापर्यंत भटके कधी पोहचतील? या साऱ्या विषम परिस्थितीवर भटक्यांनी एल्गार पुकारला. त्यातून शासनाच्या दरबाराला धडका दिल्या गेल्या. अनेकांची नेतृत्वं घडली. सरकारने नेतृत्वाला वाटाण्याच्या अक्षताच्या किमतीला विकत घेतले. काही विकले गेले नाही त्यांना बदनाम केले, काहींना एनजीओमय बनवले, काहींना कौटुंबिक बनवले, काहींना पोटभरू बनवले, बाकीच्यांना रोजी रोटीसाठी भटकत ठेवले. हे सगळे समग्र अशा तत्वज्ञानाच्या अभावात घडले. संघटना बनत राहिल्या आणि फुटत राहिल्या.

विमुक्त-जाती भटक्या जमातींना आजही संवैधानिक दर्जा नाही. त्यामुळे उच्चशिक्षणासाठी, संशोधनासाठी कुठलीही फेलोशिप नाही. जातीय अन्याय-अत्याचाराला आळा घालण्यासाठी किंवा प्रतिबंध करण्यासाठी कायद्याचे कोणतेही संरक्षण नाही. धोरणकर्ते, शासकीय अधिकारी, राज्यकर्ते आणि एकूणच समाजमनामध्ये या जातींवर असलेला गुन्हेगारीचा कलंक दिवसेंदिवस गडद होत आहे. जात, वर्ग आणि पितृसत्तेच्या तिहेरी बेड्यात बंदिस्त केलेली भटकी स्त्री मुक्तीची आस लावून आजही बसली आहे. डोंबाऱ्याच्या कसरतीच्या खतरनाक खेळात छोट्या-छोट्या मुलीच वापरल्या जातात. एक फूट कडीतून आपले संपूर्ण शरीर काढणारी डोंबारीण दिवसातनं एकदाच जेऊ शकते, तेही खेळ संपल्यावर. अशा जमातींच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक उत्थानासाठी कुठलीही आर्थिक तरतूद नाहीत. मुळात आम्ही भारतीय आहोत का? हा प्रश्न सतत मेंदूमध्ये घोंगावत आहे. आणि भारतीय असू तर त्याचे निकष काय? मापदंड काय? भारतीयत्वाचे निकष भटक्यांच्या बाबत नागरिकत्वाचे होते काय? मापदंड विकासाचे होते काय? याचाही थांगपत्ता लागू दिला जात नाही. अशा असंवैधानिक भारतीय असण्याचा शोध आजही हा समाज घेत आहे. पण गेल्या सत्तर वर्षात याचा तपास लागलेला नाही. एकूणच या प्रवर्गाविषयी केंद्रीय पातळीवर आणि राज्यपातळीवर संदिग्धतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या स्वातंत्र्याच्या सत्तरी निमित्त भटक्यांची नवी पिढी काही सांगू पाहते आहे, आवाज देऊ पाहते आहे, इशारा देऊ पाहते आहे. त्याचा सकारात्मक विचार व्हावा ही अपेक्षा. क्रांतिकारी अपेक्षा.

**नारायण भोसले** **विनायक लष्कर**

'परिवर्तनाचा वाटसरू' - १ सप्टेंबर २०१७च्या अंकात 'स्वातंत्र्य विमुक्तांचे' या विभागाचा दुसरा भाग प्रसिद्ध होणार असून त्यात साहित्य आणि चळवळ या विभागांतर्गत सचिन गरूड, संजय बालाघाटे, रेणुकादास उबाळे, वीरा राठोड यांचे लेख, तसेच जागतिकीकरणाशी संबंधित दादासाहेब मोरे यांचा एक लेख, शिवाय विमुक्त पावलं या विभागात अभिषेक भोसले, प्रतिक पुरी व प्रशांत खुंटे यांचे लेख, आणि अन्य विषयांवर पुष्पा चौधरी, नारायण भोसले, सुधीर येवले व इतर अनेक मान्यवरांचे लेख प्रसिद्ध होतील.

**संपादक व अतिथी संपादक**